REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 1 | OCTOBER - 2018

# छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यात भाळवणीच्या सदोजी निंबाळकरांचे योगदान

प्रा डॉ. स्वाती शिवाजी घाटुळे

## प्रस्तावना :


भारताच्या इतिहासामध्ये मराठयांचा इतिहास स्फुर्तिदायक आहे. देशाला आशेचा अंधुक किरणही दिसत नसताना एकाएकी सुर्याच्या कोवळया किरणांनी पराभवाचे सावट दूर व्हावे आणि मराठी माणसाची अस्मिता खडबडून जागी व्हावी व मरगळ झटकली जावी इतकी मोलाची कामगिरी मराठयांच्या इतिहासाने केली आहे. शुन्यातून विश्व निर्माण करणा–या छ. शिवाजी महाराजांनी स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. कोणतेही कल्याणकारी राज्य निर्माण करावयाचे असेल तर एकटा राजा काहीही करू शकत नाही त्यासाठी सहाय्यक माणसांची जोड घ्यावी लागते. मग ते सहाय्यक मंत्री असतील, प्रधान असतील किंवा सैन्य असेल. छ. शिवाजी महाराजांच्या काळात अनेक पराक्रमी व्यक्तिंमुळे स्वराज्याचे निशाण उभारू शकले. स्वराज्यनिर्मीतीत अनेक पराक्रमी व्यक्तिंनी मोलाचे योगदान दिले. या पराक्रमी व्यक्ती मध्ये भाळवणीच्या सिदोजी निंबाळकरांचे योगदानही महत्त्वपूर्ण आहे. प्रस्तूत शोधनिबंधात भाळवणीच्या सिदोजी निंबाळकरांचे शिवाजी महाराजांच्या स्वराज्यकार्यात योगदान व बलिदान कसे महत्त्वपूर्ण आहे यावर प्रकाश टाकला आहे.

निंबाळकर घराणे हे इतिहासात पराक्रमी घराणे म्हणून प्रसिध्द आहे. नाईक निंबाळकर घराणे हे मूळचे धारचे परमार होते. माळव्यात त्यांचे राज्य इस्लामी आक्रमणात नष्ट झाले. त्यांचे वंशज महाराष्ट्रात निंबळक येथे राहिले त्यावरून निंबाळकर हे नाव पडले. शिवाजी राजांची पत्नी सईबाई या फलटणच्या निंबाळकर घराण्यातील होत्या. त्यांना तीन भाऊ होते. त्यापैकी जगदेवराव नाईक निंबाळकर व साबाजी नाईक निंबाळकर हे सावत्र बंधू तर बजाजी नाईक निंबाळकर हे सख्खे बंधू होते. बजाजी नाईक निंबाळकर यांना फलटणची जहागिरी दिली तर जगदेवराव यांना भाळवणी व त्या आसपासचा मुलूख दिला. साबाजी निंबाळकर यांना दहिगांव येथील परगाण्याचा कारभार दिला. मुधोजी नाईक निंबाळकर यांनी आपल्या तीन मुलांच्या जहागिरीची व्यवस्था लावून दिली. त्यापैकी पंढरपूर जवळच असलेल्या भाळवणी शाखेत इ.स. 1641 मध्ये जगदेवराव नाईक निंबाळकर हे कारभार करू लागले.[1] त्यांचेच पुत्र सिदोजी निंबाळकर यांनी शिवरायांच्या स्वराज्यकार्यात सहभागी होऊन आपला पराक्रम सिध्द केला.

अफझलखानाच्या वधापासून शिवरायांच्या जालना स्वारीपर्यंतच्या अनेक मोहिमामध्ये, लढायांमध्ये सिधोजी निबांळकरांचा सहभाग होता. त्यांचा पराक्रम व शौर्य पाहूनच शिवरायांनी त्यांना सरलष्कर हे पद दिले होते तसेच त्यांना सेनापंचसहस्त्री असा हुद्दा ही देण्यात आला होता.[2] अफजलखानवधाच्या वेळेस सिधोजी निंबाळकर हे शिवरायांच्या बाजूने स्वारीमध्ये सहभागी झाले होते. या बाबतची माहिती राजा शिवछत्रपती खंड–1 मध्ये पुढील प्रमाणे दिली आहे .भाळवणीच्या नाईक निबांळकर घराण्यातील सरलष्कर सिधोजी नाईक निबाळकर शिवरांयाच्या सांगाती अफझलखानाने केलेल्या स्वारीमध्ये शिवरायांच्या वतीने युध्दनिपूण सेनानायक म्हणून हजर होते.[3]

## साल्हेरची लढाई व सिदोजी निंबाळकरांचा पराक्रम ..

औरंगजेब बादशहाने बहादूरखान व दिलेरखानास साल्हेरचा किल्ला जिंकून घेण्याची जबाबदारी दिलेली होती. त्यासाठी त्यांना चाळीस हजार सैन्य दिले होते. इखलासखान मियान, मुहकमसिंह चंद्रावतराव, अमरसिंह चंद्रावत असे मात्तबर सरदारही त्यात सामील होते. साल्हेरच्या किल्ल्याला मोगलांनी प्रचंड फौजेनीशी वेढा घातला. एक महिना किल्ल्याला वेढा घालूनही त्यांना किल्ला जिंकता येईना. तेव्हा बहादूरखानाने वीस हजार सैन्य देऊन इखलासखानास साल्हेरकिल्ल्याला वेढा घालून राहण्यास सांगितले व स्वतः आपल्याबरोबर दहा हजार सैन्य घेवून नगरमार्गे सुप्याकडे गेला, तर दिलेरखान दहा हजार सैन्य घेवून रवळा किल्ल्यावर चालून गेला. मोगलांनी साल्हेरच्या किल्ल्यास वेढा घातल्याचे कळताच शिवरायांनी प्रतापराव गुजर व मोरोपंत पिंगळे यांना साल्हेरीच्या मदतीसाठी पाठविले. रस्त्यातच मारोपंत पिंगळयांना दिलेरखानाने रवळा किल्ल्याला वेढा घातल्याचे समजताच त्यावर छापा टाकून त्यांना बेजार केले.रवळा किल्ला दिलेरखानाला मिळाला नाही. याचा बदला घेण्यासाठी दिलेरखानाने पुण्याकडे चाल केली. तो पुण्यात येण्याअगोदरच मोरोपंत पिंगळे आणि प्रतापराव गुजर हे उभयंता साल्हेरला वेढा घालून बसले होते. पुण्यात दिलेरखानाने पराभवाचे उट्टे



काढण्यासाठी अत्याचार चालविला होता. याची बातमी मराठयांना समजल्यावर मोगलांच्या अत्याचाराचा बदला घेण्यासाठी लढाई करण्याचे ठरविले.

फेब्रुवारी 1672 ला मराठयांनी मोगल सैन्यांशी लढाई केली. या लढाईत मोगलांचे तीस मोठे अमंलदार मराठयांनी कैद केले. साल्हेरच्या युध्दात मराठयांना प्रचंड विजय मिळाला.प्रतापराव गुजर मारोपंत पिंगळे इतर सेंनानी व त्यांच्याबरोबर सिधोजी निंबाळकर या सर्वांनी मोठया निकराने लढा दिला व विजय मिळविला.[4] मराठयांनी मोगलांशी मोकळया मैदानावर दिलेल्या पहिल्या लढाईत प्रचंड विजय मिळविला. त्यामुळेछ. शिवरायांनाही मोठा आनंद झाला.या विजयामुळे मोगलांची प्रतिष्ठा धुळीस मिळाली. सिधोजी निबांळकर यांनी शिवरांयाच्या सेवेत राहून साल्हेर किल्ला व पुण्याच्या आसपासचा प्रदेश मोगलांना जिंकू न देण्यात पराक्रमाची शर्थ केली. साल्हेरच्या विजयात त्यांचा सिहांचा वाटा आहे.

## उमराणीच्या लढाईत खवळलेल्या हत्तीला काबूत आणले..

इ.सन 1672 मध्ये आदिलशाही सरदार बहलोलखान हा स्वराज्यावर चालून आला. त्याच्या बंदोबस्तासाठी शिवरायांनी प्रतावराव गुजर यांची रवानगी केली. सेनापती प्रतापरावांच्या नेतृत्वाखाली इतर सेनांनी बरोबर सिदोजी निबाळकर ही होते. प्रतावराव गुजरांनी बहलोलखानाला उमराणीजवळ गाठले. तेथील पाणीसाठा मराठी सैन्यांनी ताब्यात घेऊन खानाची नाकेबंदी केली. रूपाजी भोसले, सोमाजी मोहिते, सिदोजी निबांळकर, यांनी मोठा पराक्रम करून बहलोलखानास शरण येण्यास भाग पाडले. या लढाईत विजापूरकरांचा एक हत्ती मदोन्मत होऊन अनेकांना ठार मारू लागला. त्या हत्तीला शांत करून सिदोजी निबांळकर यांनी मराठयांकडे आणले.[5] आदिलशहाचा मदोन्मतझालेला हत्ती सिदोजी निबांळकरांनी काबूत आणला. हत्तीच्या बळासारखे मावळे शिवाजी महाराजांना स्वराज्य कार्यात मिळाले. अशा पराक्रमी मावळयांमुळे शिवाजी महाराजांनी स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.

## छत्रपती शिवरांयाची जालना स्वारी व सिदोजी निंबाळकरांचे बलिदान ......

छत्रपती शिवरायांच्या आयुष्यातीलशेवटची मोहिम म्हणजे जालना स्वारी. या जालना स्वारीच्या वेळी सिदोजी निंबाळकर यांनी मोलाचे सहकार्य करून स्वराज्यसेवेसाठी आपलेप्राण अर्पण केले. इ.स. 1679 साली दिलेरखानाने विजापूर शहराला वेढा घातला होता. त्यावेळी विजापूरकरांना मदत करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज, आनंदराव मकाजी आणि सिदोजी नाईक निंबाळकरासह वीस हजार सैन्य घेऊन विजापूर जवळील सलगर येथे थांबले होते. या सैन्याचे दोन भाग करून त्यातील दहा हजार सैन्यांची एक तुकडी आनंदराव मकाजी यांच्या नेतृत्वाखाली देवून त्यांना मोगली मुलूखात धामधूम करण्यासाठी रवाना केले होते. दुसरी दहा हजाराची तुकडी घेऊन शिवाजी महाराज दिलेरखानाचे लक्ष वेधण्यासाठी जालन्यापर्यंत प्रदेश लूटमार करीत चार नोव्हे. 1679 रोजी जालण्यात पोहचले.[6] जालना स्वारीत शिवरायांबरोबर सिदोजी निंबाळकर ही आपले सैन्य घेवून हजर होते.

जालना पेठ छत्रपती शिवरायांनी सतत चार दिवस लूटली. अत्यंत श्रीमंत अशा पेठेत महाराजांना सोने, रूपे, हत्ती, घोडे व अगणित मालमत्ता सापडली. लूटीचे सामान घोडे उंटावर लादलेले होते. सर्व लूटीसह महाराज परत येत असताना मोगलांचे सरदार रणमस्तखान, आसफखान, जाब्दीरूखान, केसरीसिंग, सरदारखान व अन्य उमराव 8–10 हजार फौजेसह महाराजांवर चालून आले. जालना स्वारीत आणलेली लूट व महाराजांचा जीव धोक्यात आला असता सिदोजी निंबाळकर यांनी मोगली सैन्याला थोपवून धरण्याचा मनसुबा बोलून दाखविला. मोजक्या लोकांच्या मदतीने सिदोजी निंबाळकर यांनी मोगलांशी सतत तीन दिवस प्रखर झुंज दिली. शत्रुला थोपवून धरण्यात ते यशस्वी झाले. शिवाजीराजे व काही सैन्यांसह आणलेली लूट पट्टा किल्ल्याकडे जाऊ देण्यास मदत केली. छत्रपती शिवराय पट्टा किल्ल्यावर 22 नोव्हे. 1679 रोजी सुखरूप पोच झाले.[7] मोगली फौजेला तोंड देत असताना सिदोजीरावांना वीरमरण आले.

सिदोजी निंबाळकरांच्या पराक्रमाबाबत सर जदुनाथ सरकार लिखित औरंगजेबाचा इतिहास या पुस्तकात पुढील उल्लेख आला आहे. जवळ जवळ चार दिवस जालना शहर लूटल्यानंतर, श्शहराचा पूर्णपणे विध्वंस केल्यानंतर मराठयांनी त्यांची मोजदाद करता येणार नाही इतके सोने, चांदी, हिरे, कापडचोपड, हत्ती, उंट यासह माघार घेत असतानाच रणमस्तखान नावाच्या एका धाडसी मोगल अधिका–याने त्यांच्या पिछाडीवर हल्ला केला. तीन दिवसापर्यंत सिदोजी निंबाळकर व मराठा सरदारने पाच हजार स्वारानिशी त्यांना थोपवून धरले. परंतु त्यांच्या अनेक माणसासहीत तो मारला गेला.[8]

ज्याप्रमाणे बाजीप्रभू देशपांडे यांनी घोडखिंड लढविली व शिवरायांना विशालगडावर सुखरूप पोहचू दिले व स्वतः वीरमरण पत्करले. त्याप्रमाणे जालना स्वारीच्या वेळी सिदोजी निंबाळकरांचा पराक्रम नसता तर छत्रपती शिवराय व त्यांनी मिळविलेली लूट स्वराज्यापर्यंत पोहचणे अशक्य होते असे म्हणणे सार्थ ठरेल. स्वराज्यासाठी त्यांचे बलिदान महत्वपूर्ण ठरले. भाळवणीच्या नाईक निंबाळकर घराण्यातील पराक्रमाची परंपरा तेथून पुढे 150 वर्षे चालू होती. या घराण्यात पुढे हणमंतराव निंबाळकर, हैबतराव निंबाळकर, सुलतानजी नाईक निंबाळकर, लिंबाजी नाईक निंबाळकर, खंडेराव नाईक निंबाळकर अशी एकापेक्षा एक सरस पराक्रमी पुरूषांची परंपराच निर्माण झाली. सिदोजी निंबाळकरांचा साल्हेरच्या लढाईतील पराक्रम व जालना स्वारीतील बलिदानयादोन घटनेवरून त्यांच्या पराक्रमाची कल्पना येते. शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेपासूनच्या कार्यात अनेक लढाया झाल्या स्वराज्यरक्षणासाठी अनेक शुरवीरांचे बलिदान गेले. बाजीप्रभू देशपांडे, तानाजी मालसुरे, मुरारबाजी देशपांडे, शिवानाव्ही, प्रतापराव गुजर अशा अनेक ज्ञात –अज्ञात नावे आहेत. जालना स्वारीतील सिदोजी निंबाळकरांचे बलिदान याच साखळीतील शेवटचे बलिदान ठरते.

## संदर्भ सूचि

1 सरदेसाई गो. स, ऐतिहासिक घराण्याच्या वंशावळी  गव्हर्नमेंट सेंट्रल प्रेस, 1957, प्र.कं. 71
2 सरदेसाई गो. स, मराठी रियासत, खंड –2. पॉप्यूलर प्रकाशन, मुबंई 2012. पृ.कं. 341
3 मेहेंदळे गं. भा, राजा शिवछत्रपती खंड –7, 1999, पृ.कं. 951
4 देशमुख विजय,  श्शककर्ते शिवराय, खंड , छत्रपती सेवा प्रतिष्ठा नागपूर, 1982 प्र.कं. 206.
5 तत्रैव प्र.कं.  226
6 देशमुख विजय, शककर्ते शिवराय, खंड 2 छत्रपती सेवा प्रतिष्ठाण, नागपूर, 1984.
7. सरदेसाई गोस, मराठी रियासत खंड , 1 पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, 2012, प्र.कं. 340.
8 कुंटे. भ.गं, (भाषा) , सर जदुनाथ सरकार लिखित औरंगजेबाचा इतिहास. म.रा.सा.व संस्कृती मंडल, मुंबई, 1978, प्र.कं. 527.